بسم اللہ الرحمن الرحیم نحمدہ ونصلی علی رسولہ الکریم وعلی عبدہ المسیح الموعود
لا الہ الا اللہ محمد رسول اللہ
دفتر مجلس انصاراللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Ph:+91-1872-220186, Fax: +91-1872-224186, Mob. +91-98154-94687, E-mail:ansarullahbharat@gmail.com

फक्त वाईट गोष्टींपासून दूर राहणे म्हणजेच तक़्वा नाही  खरा तक़्वा म्हणजे चांगल्या कार्यांवर ठाम राहणे आणि त्यांना सातत्याने करत राहणे होय.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيْكَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔
إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔
صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

३१ मार्च २०२५ रोजी, मस्जिद मुबारक, इस्लामाबाद (यूके) येथे  हजरत मिर्झा मस्रूर अहमद (खलीफतुल मसीह पाचवे) यांनी दिलेल्या ईद-उल-फित्र खुतब्याचा संक्षिप्त मराठी सारांश दिला

## तशह्हुद, तअव्वुज आणि सूरह अल-फातिहा यांचे पठण केल्यानंतर हुजूर अन्वर अय्यदहुल्लाहु तआला यांनी असे सांगितले की...

रमजान काल संपला आणि आज आपण अल्लाह तआलाच्या कृपेने ईद-उल-फित्र साजरी करत आहोत.हा आनंदाचा दिवस आपण यासाठी साजरा करत आहोत की रमजानमध्ये आपण जी सत्कर्मे केली आणि जी सत्कर्मे कायम ठेवण्याचा व पुन्हा नव्याने संकल्प करण्याचा निर्धार केला, त्या गोष्टींचा आनंद साजरा करावा. म्हणून ही ईद फक्त आनंद साजरी करण्याचा दिवस नाही, तर ही एक संकल्प करण्याचा दिवस देखील आहे की आता आपण त्या सर्व चांगल्या कर्मांना कायम राखू.जर हे घडले, तरच आपली ईद खरी ईद ठरेल. पूर्ती फक्त वाईट गोष्टींपासून दूर राहणे हेच तक़्वा नाही, तर खरा तक़्वा (देवाची भीती आणि त्याच्या आदेशांनुसार योग्य जीवन जगणे याला तक़्वा म्हणतात)  म्हणजे चांगल्या कर्मांवर ठाम राहणे आणि त्यांना सातत्याने करत राहणे होय.आज आपण हा संकल्प पुन्हा करतो की अल्लाहचे हक्क आणि माणसांचे हक्क बजावणे यांवर आपण नेहमी ठाम राहू. ईद फक्त खाणे-पिणे, खेळणे- बागडणे किंवा नवीन कपडे घालण्याचे नाव नाही, तर ईद आपल्याला हा संदेश

देते की आपण पुढेही चांगल्या गोष्टी करणे सुरू ठेवावे आणि वाईट गोष्टींपासून दूर रहावे. जर आज ईद साजरी केल्यानंतर आपण पुन्हा त्या स्थितीत परतलो जिथे काही जण रमजानपूर्वी होते, किंवा आपले पाऊल प्रगतीच्यादिशेने पुढे जात नाही, तर हे मुमिन मोमिनच्या योग्यतेला अनुरूप नाही मुमिन म्हणजे तो **जो** सतत चांगल्या कर्मांमध्ये पुढे पुढे जात राहतो. आजच्या दिवशी आपल्याला स्वतःचे परीक्षण करावे लागेल की आपण या संकल्पावर ठाम राहण्यासाठी स्वतःला तयार करत आहोत की नाही आपण खरोखरच अल्लाह् तआलाच्या दिलेल्या वचनाची पूर्तता करण्याचा प्रयत्न करत आहोत की नाही, याचा विचार करणे आवश्यक आहे.. तत्त्वत हे असे व्हायला हवे की ईद-उल-फित्र आपल्याला हे दर्शन दाखवते की एका महिन्याच्या उपवासानंतर आपल्याला अल्लाह मिळाला आहे आणि जर अल्लाह मिळाला, तर नक्कीच आपल्याला चांगल्या कर्मांमध्ये प्रगती दिसायला हवी. ईदचा दिवस फक्त आनंद साजरा करण्याचा दिवस नाही, तर हा उपासनेकडे विशेष लक्ष देण्याचा दिवस आहे. या दिवशी इतर दिवसांच्या तुलनेत आपल्यावर जास्त नमाजांची जबाबदारी आहे. इतर दिवसांमध्ये आपल्यावर पाच नमाजे अनिवार्य आहेत, पण ईदच्या दिवशी आपल्यावर सहा नमाजे फर्ज होतात. जर आपल्याला अल्लाह मिळाला नाही, जर आपण त्याची उपासनेची जबाबदारी पार पाडली नाही आणि माणसांचे हक्क पूर्ण केले नाहीत, जर आपण अल्लाहला प्राप्त करण्याचा कर्तव्य पार पाडले नाही, तर फक्त आनंद साजरा करणे हे ईदचे खरे उद्देश नाही. माणसांचे हक्क पूर्ण करणे देखील आवश्यक आहे; हे ही एक प्रकारचे उपासना आहे.

असा व्यक्ती ज्याला अल्लाह मिळाला नाही, त्याचे उदाहरण हजरत मुसलह मऊद रझियल्लाहू अन्हो यांनी अशा पागल व्यक्तीशी दिले आहे, ज्याला हिरे-मोत्यांची किंमत कळत नाही आणि तो काचाच्या तुकड्याला हिरा समजतो.जेव्हा माणसाला अल्लाह सोबत खास नातं निर्माण होईल, तेव्हाच तो अल्लाहला ओळखू शकेल.ज्याला अल्लाह तआला आवडतो, त्याला स्वतःची ओळख आणि परिचय देतो.एक खरा विश्वासू याचा आनंद हाच आहे की त्याला अल्लाह प्राप्त होतो.

हजरत मुहम्मद ﷺ यांनी फरमावले आहे की, एका आईला तिच्या हरवलेले बाळ सापडल्यावर जितका आनंद होतो, त्याहूनही जास्त आनंद आपल्या बंदा त्याच्याकडे येण्यावर अल्लाहला होतो.

हजरत मसीह मऊद अलैहिस्सलाम ( علیہ السلا م) म्हणतात की, ईदचा दिवस निःसंशय पवित्र आणि मंगलमय दिवस आहे, पण एक दिवस त्यापेक्षा देखील अधिक पवित्र दिवस आहे, आणि तो दिवस म्हणजे मनुष्याचा **क्षमायातना** करण्याचा दिवस.हा दिवस शुक्रवारच्या किंवा ईदच्या दिवसापेक्षा जास्त आनंद देणारा दिवस आहे. फरमावले की, खऱ्या तौब्याबरोबर खऱ्या पवित्रतेची आणि शुद्धतेचीही आवश्यकता आहे.सर्व प्रकारच्या अशुद्धता आणि घाणिपासून दूर राहणे आवश्यक आहे; अन्यथा फक्त तौबा करण्याचे शब्द वारंवार म्हणणे काही उपयोगाचे नाही. जो दिवस असा पवित्र दिवस असेल ज्यात माणूस आपल्या वाईट कर्मांवर तौबा करून अल्लाहसोबत खऱ्या संधीचा करार करतो आणि त्याच्या आज्ञांसाठी आपले मन समर्पित करतो, तर यात शंका नाही की त्याला त्या दंडापासून वाचवले जाईल जो गुप्तपणे त्याच्या वाईट कर्मांच्या फळस्वरूप तयार होत होता, आणि अशा प्रकारे तो माणूस त्या गोष्टीला परिप्त करेल ज्याची त्याला कदापि अपेक्षा नव्हती.

आजकाल जगात खूप घाण आहे, पण अशा दिवसांमध्ये जेव्हा एखादा मुमिन अल्लाहच्या खातिर उपवास करतो आणि त्याच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा अल्लाह त्याला त्याचे फळ खूपच मोठ्या प्रमाणात देतो.जेव्हा आपण या गोष्टींवर अमल करण्याचा प्रयत्न करू, तेव्हा आपण आणि आपले कुटुंब खऱ्या ईदच्या आनंदाचा अनुभव घेऊ, जो ईदचा खरा उद्देश आहे. अल्लाह करे की आपण आता त्या सत्कर्मांना सातत्याने चालू ठेवणारे बनू जे आपण रमजानमध्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न केला होता.जर रमजानमध्ये आपण तरावीह किंवा तहज्जदसाठी मशीदीत येत होतो, तर आता घरात काहीतरी नवाफल (ऐच्छिक उपासना) करण्याची तयारी करणारे होऊ.अल्लाह करे की आपण माणसांचे हक्क पूर्ण करणारे आणि एकमेकांचे हक्क पाळणारे बनू शकू.अल्लाह तआला ही पवित्र बदल आपल्या मनात सातत्याने निर्माण करत राहो. .हुजूर अन्वर यांनी प्रार्थनांची प्रेरणा देताना फरमावले की, प्रार्थना करत राहा की अल्लाह तआला सर्व अहमदिया मुसलमानांना स्वतःच्या हिफाजतीत ठेवा. खूप ठिकाणी अनेक असहाय अहमदिया अनावश्यकपणे नाव केवळ कायद्याच्या अटींमुळे अडचणीत आहे, जसे पाकिस्तानमध्ये जेथे धार्मिक स्वातंत्र्य असूनही ईदच्या नमाजसुद्धा पढू शकत नाहीत. अल्लाह तआला त्यांना ही संधी देवो की ते खऱ्या अर्थाने ईद साजरी करणारे बनतील, स्वतःला अल्लाहच्या जवळ नेणारे बनतील आणि ईदच्या बाह्य आनंदांचा योग्य रीतीने अनुभव घ्यतील.अल्लाह तआला त्यांचे सर्व त्रास लवकर दूर करो आजही मोठ्या भीतीच्या स्थितीत त्यांनी ईदची नमाज अदा केली आहे, वेळ आणि ठिकाण बदलत राहून नमाज अदा केली.

कराचीसह काही ठिकाणी नमाज अदा करण्यापासूनही रोखले गेले, आणि मशीदीवर विरोधकांनी हल्ले केले.कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांची स्थिती अशी आहे की, हल्लेखोरांना थांबवण्याऐवजी त्यांनी आमच्या मशिदीवर लॉक लावले आणि मशीदी बंद केल्या.म्हणून हा दिवस उपासनेसाठी एक विशेष दिवस आहे आणि हे आपल्याला लक्षात ठेवणे आवश्यक आहे.अल्लाह तआला लवकरच त्यांच्या विरोधकांना योग्य शिक्षा देण्याची व्यवस्था करो. आमीन।रुग्णांसाठीही प्रार्थना करा, अल्लाह तआला सर्व रुग्णांना आरोग्य आणि **स्वास्थ्य** देवो.मानवता, इस्लाम आणि समुदायासाठी आर्थिक आणि इतर सर्व प्रकारच्या बलिदान करणाऱ्यावर अल्लाह तआला आपल्या कृपेचे वरदान प्रदान करो. आमीन।

शहीदांच्या मुलांसाठी, अल्लाहचे मार्गावर बंदी असलेल्यांसाठी, वरिष्ठ असलेल्या लोकांसाठी आणि सर्वसामान्यपणे मुस्लीम समाजासाठी प्रार्थना करा. अल्लाह तआला मुसलमानांना बुद्धी आणि समज देवो, जेणेकरून हे लोक खऱ्या अर्थाने अल्लाहच्या संरक्षणात येऊ शकतील.या काळात हजरत मसीह मऊद (علیہ السلام) यांचा स्वीकार करून, हे लोक अल्लाहची प्रसन्नता मिळवू शकतील आणि खऱ्या अर्थाने ईद साजरी करू शकतील.

खुतबा दुसऱ्या भागाच्या समाप्तीवर, हुजूर अन्वर यांनी संपूर्ण आंतरराष्ट्रीय अहमदिया मुस्लिम समुदायाच्या सर्व मित्रांना ईदच्या शुभेच्छांचा भेट दिला. त्यानंतर हुजूर अन्वर अय्यदहुल्लाहु तआला यांनी सांगितले की, "मी म्हटले होते की पाकिस्तानमधील लोकांना सतत प्रार्थनांमध्ये लक्षात ठेवा. परिस्थिती खूप कठीण आहे. अल्लाह तआला खऱ्या अर्थाने त्यांच्यासाठी ईद साजरी करील.सर्वांना ईदच्या शुभेच्छा.दुःखी लोक घरात बसले आहेत. बाह्यदृष्ट्या निराशा आहे, पण त्यांना काळजी करू नये.अल्लाह तआला, इंशाअल्लाह, लवकरच परिस्थिती बदलेल. (आमीन)

اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلاَ مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلاَ ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَآ اِلٰہَ اِلاَّ اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔